भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये    Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

## करारनामा

करारनामा लिहुन घेणार :- **आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला.**
(या करारनाम्यात यापुढे यांना पक्ष क्रं. १ संबोधण्यात येईल)

करारनामा लिहुन देणार :- **अध्यक्ष, स्काय एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी, अकोला**
(या करारनाम्यात यापुढे यांना पक्ष क्रं. २ संबोधण्यात येईल)

अध्यक्ष स्काय एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी यांचे सोबत तत्कालीन नगर परिषदेने दिनांक २१.१०.२०० रोजीचे करारनाम्यानुसार मौजे उमरी सर्व्हे नं. ६०,६१,६२ येथील जागा ८ वर्ष ११ महिन्या करिता विकसीत करण्याकरिता दिली होती. परंतु संस्थेने सदर करानाम्यातील शर्ती व अटींचा भंग केल्यामुळे सदर करारनामा रद्द करण्यात आला आहे. ज्याअर्थी पक्ष क्र. २ यांनी पक्ष क्र. १ यांना दिनांक २७.०७.२००६ रोजीचे अर्जाप्रमाणे स्काय एज्युकेशनल ॲन्ड वेलफेअर सोसायटी अकोला या संस्थेला बालवाडी व शैक्षणीक वापर या उद्देशाकरिता बिर्ला कॉलनी, जठारपेठ येथील मौजे उमरी सर्व्हे नं. ६०.६१,६२ येथील मंजुर अभिन्यामधील खुल्या जागेपैकी २१५४.६० चौ.मिटर क्षेत्रफळ असलेली जागा पैकी १० टक्के जागा (२१५.४६ चौ.मिटर) जागेवर सार्वजनीक सुविधा नागरीकांना उपलब्ध करुन देणे या उद्देशाकरिता विकसीत करण्याकरिता मागीतलेली आहे. त्याप्रमाणे उर्वरीत ९० टक्के जागा ही बगीचा, वृक्षारोप उपयोगा करिता विकसीत करणे करिता पक्ष क्र. २ यांना देण्याबाबत पक्ष क्र. १ यांनी सहमती दर्शविली असून त्यानुसार खालील शर्ती व अटीवर दोन्ही पक्ष महानगरपालिकेचे हितास्तव करारनामा करित आहे.

सदर जागेपैकी ९० टक्के जागा पक्ष क्र. २ यांनी विकसीत करावयाची आहे त्या जागेत संस्था नियोजीत उद्देशाकरिताच विकास करेल. त्याप्रमाणे खालील अटी व शर्तीवर जागा सार्वजनीक विकसीत करणे करिता देण्याचा करार करण्यात येत आहे.

करारच्या अटी व शर्ती :-

१. पक्ष क्र. १ कडुन पक्ष क्र. २ यांना खालील प्रमाणे सदर करारपत्राचे तारखेपासुन ३० वर्षा करिता देण्यात येत आहे.

Trustee
Sky Educational & Welfare Society

२. यापुर्ण जागेचे बाजार मुल्य रु. ७,५३,९००/- असून त्यापैकी ५० टक्के रक्कम रु. ३,७६,९५०/- भरण्याचे दिनांक १९.०९.२००६ रोजी पक्ष क्र. २ ने मान्य केले असून. त्यानुसार ५० टक्के रक्कमेचा एक रक्कमी भरणा दिनांक ०३.११.२००६ रोजी पक्ष क्र. २ ने केला आहे.

३. एकुण २१५४.६० चौ. मिटर जागेच्या १० टक्के एवढी म्हणजेच २१५.४६ चौ.मिटर या जागेवर पुर्ण जागेच्या एका कोपऱ्यात बांधकाम विकास नियमावली नुसार अनुज्ञेय ठिकाणी पक्ष क्र.२ यांना उल्लेखीत उद्देश पुर्तीसाठी बांधकाम अनुज्ञेय राहील. सदर बांधकाम करणेपुर्वी पक्ष क्र. १ ची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

४. पक्ष क्र. २ ला संस्थेस जागेवर स्वतः इमारत बांधावी लागेल व तिचा संपुर्ण सेवा शुल्क, मालमत्ता कर व इतर देय कर नियमानुसार वेळेवर भरावा लागेल. इमारत फक्त उद्देशित कामा करिता वापरता येईल. परंतु या जागा अथवा इमारतीचा कोणत्याही तऱ्हेने उत्पन्नाचे साधन म्हणुन उपयोग करता येणार नाही.

५. संपुर्ण जागेस पक्ष क्र. २ सर्वप्रथम आवार भिंत/चेनलिंक फेन्सींग/तार फेन्सींग प्राधान्याने करतील व बांधकामा व्यतीरिक्त उर्वरीत ९० टक्के जागेत पक्ष क्र. २ ने बगीचा, वृक्षारोपन या नियोजीत उद्देशाकरिता प्रथम विकासीत करावा लागेल.

६. खुल्या जागेत आवश्यक फ्लड लाईट, नागरीकांना बसण्याकरिता बेंचेस पक्ष क्र. २ ने लावावे व त्याचे उभारणी व पुढील देखभाल खर्च पक्ष क्रं. २ ने करावा.

७. या जागेचे सिमेवर योग्य ठिकाणी व योग्य अंतरावर पक्ष क्र. २ ने वृक्षारोपण करुन वृक्षांचे देखभाल व संरक्षण करावे.

८. अभिन्यासातील खुल्या जागेचे व्यवस्थापन, देखभाल पक्ष क्र. २ ने करावी.

९. ९० टक्के जागेचा वापर नागरीकांना सार्वजनीक उपयोगासाठी करता येईल व याकरिता धर्म,जात,पंत, पक्ष इत्यादी बाबत पक्ष क्र. २ भेदाभेद करणार नाही. व सर्वांसाठी विनाअट सामान्य उपयोगा करिता खुला राहील.

१०. या करारनाम्यातील शर्तीचे उल्लंघन पक्ष क्र. २ ने केले नाही तर या कराराचे नुतनीकरण पक्ष क्र. १ कडुन तत्कालीन प्रचलीत नियमानुसार व आवश्यकत्या मंजुऱ्या घेवुन व पक्ष क्र. २ यांची मागणी असल्यास करता येईल.

११. या करारनाम्यातील शर्तीचे उल्लंघन पक्ष क्र. २ ने करु नये तसे केल्यास पक्ष क्र. १ यांना करारनामा रद्द करण्याचे किंवा दंडीत करण्याचे अधिकार राहील व पक्ष क्रं.२ ला कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

१२. सदर जागेवरील इमारत ही संस्थेच्या मालकीची म्हणुन राहणार नाही या करारनाम्यातील अटीचे उल्लंघन झाल्यास अथवा संस्थेस जागा नको असल्यास त्यावरील इमारतीसह उपरोक्त जागा विनाअट अकोला महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावी लागेल.

१३. सदर अभिन्यासाची जागा परस्पर दुसऱ्या संस्थेस कोणत्याही तऱ्हेने भाड्याने अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

सदरील कराराच्या अटीनुसार पक्ष क्र. १ आणि पक्ष क्र. २ आज दिनांक .६/१२/०६. रोजी अकोला येथे कराराच्या अटी समजुन घेवून मान्य झाल्याने स्वाक्षरी करीत आहे.

साक्षीदार :-

१. ........ (Pankaj Kothari)

२. ........

पक्ष क्र. १ ............

आयुक्त

अकोला महानगरपालिका, अकोला

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF AKOLA ESTB. 1-10-2001

Sky Educational & Welfare Society, Akola

पक्ष क्र. २ ............

Vice President

Scanned with OKEN Scanner